आ.क्र. २९४२/२०१३
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई
यांचे कार्यालय
धर्मादाय आयुक्त भवन, ३ रा मजला
८३, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी
मुंबई ४०० ०१८

22 APR 2013

विषय :- दहशतवाद विरुध्द उपाय योजना.

संदर्भ :- वरिष्ठ पोलीस निरीक्षक,वरळी पोलीस ठाणे,मुंबई यांचे पत्र जा.क्र.४७००/१३,दि.१५/४/२०१३.

# परिपत्रक क्र. ३६० दि. २२/४/१३.

उपरोक्त विषयास अनुसरुन या परिपत्रकान्वये सर्व अधिकारी, कर्मचारी,तसेच सर्व संबंधित वकील वर्ग, अभ्यागंत यांना कळविण्यात येते की, दहशतवाद विरुध्द उपाय योजना म्हणून या कार्यालयाच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यालयात येणा-या अभ्यांगतांच्या सामानांची तपासणी करण्यात यावी. तसेच कार्यालयीन अभ्यांगत नोंदवहीत त्याची नोंद घेण्यात यावी. त्याप्रमाणे सरकारी वाहनाव्यतिरिक्त (कार्यालयनी अधिकारी व कर्मचारी, वकीलवर्ग व्यतिरिक्त) अनोळखी वाहनांना कार्यालयाच्या आवारात प्रवेश देण्यास मज्जाव करण्यात येत आहे. तसेच धर्मादाय आयुक्त भवनाचे मुख्य प्रवेशव्दार व बीजे खेर मार्गाकडील (पहारेकरी यांचे चौकीकडील) प्रवेशव्दार बंद ठेवण्यात येत आहे. याची सर्वसंबंधितानी नोंद घ्यावी.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :-
१) सूचनाफलक
२) धर्मादाय सह आयुक्त, बृहन्मुंबई विभाग,मुंबई
३) आस्थापना शाखा,मुख्यालय
४) सर्व पहारेकरी.

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचनांचे पालन न झाल्यास किंवा अनुचित प्रकार झाल्यास संबंधित पाळीत कार्यरत असलेल्या पहारेक-यास जबाबदार धरुन त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी. तसेच गरज नसेल त्यावेळी प्रवेशव्दार बंद ठेवण्यात यावेत.